INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 11 | DECEMBER - 2021

# एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत अनुसूचित जमाती करिता राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व सामुहिक योजनाचा अभ्यास"

**डॉ. प्रशांत काशिनाथ लभाने**
सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग संतोष भिमराव पाटील कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.

## प्रस्तावना :



भारतीय संविधानामध्ये वर्षानुवर्षे मागासलेल्या दलित, पिडीत, शोषीत, वंचित समुहांना वर्गीकृत करुन त्यांना आरक्षणाच्या माध्यमातून सर्व सामान्य सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या. त्यानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अशी विशेष वर्गवारी करण्यात आली. भारतीय संविधानात आदिवासींना 342 कलमान्वये घटनेच्या 5 व्या अनुसूचित "अनुसूचित जमात" असा दर्जा देण्यात आला. हे प्रावधान आदिवासी समूह विकासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले आहे. भारतीय प्रजासत्ताकाच्या सहा दशकाच्या कालखंडानंतरही आदिवासी समुदाय विकास प्रक्रियेचा भाग बनलेला प्रतित होत नाही. वर्तमानात अनेक आदिवासी जमाती प्रारंभिक अवस्थेत जीवन कंठितांना दृष्टीस पडतात. त्यामुळे विद्यमान स्थितीत आदिवासींचे स्थान निश्चित करतांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व सामुहीक योजनांचे योगदान तपासणे क्रमप्राप्त आहे.

## संशोधनांची उद्दिष्ट्ये

1) प्रकल्पा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व सामुहीक शिर्षा खालील योजनांचा आढावा घेणे.
2) प्रकल्पा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व सामुहीक शिर्षा खालील योजनावर झालेला खर्च, प्राप्त निधी व लाभार्थ्यांचा अभ्यास करणे.

## संशोधन माहीती संकलन व संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक स्त्रोतात प्रत्यक्ष मुलाखती अनुसूचिचा उपयोग केला तर दुय्यम स्त्रोतात प्रकल्पा अंतर्गत प्रकाशीत अहवाल व प्रत्यक्ष प्रकल्पातील कार्यालयीन उपलब्ध साहित्याचा उपयोग केला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर जिल्हयातील 10 आदिवासी बाहुल्य तालुक्याची निवड केली व 10 तालुक्यातुन सहेतूक पद्धतीने उत्तरदात्याची नमुना म्हणून निवड केली आहे.

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची पार्श्वभुमी :

पहील्या पंचवार्षिक योजनेत आदिवासी विकास करण्याच्या दृष्टीकोनातून प्रथम प्रयत्न करण्याची सुरुवात झाली. त्या योजनेत आदिवासी विकासासाठी काही प्रमाणात कार्यक्रमाची आखणी करुन कार्यक्रम राबविण्यात आले. परंतु पहील्या योजनेत विशेष फलश्रृती आली नाही.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत आदिवासी विकासाच्या दृष्टीकोनात काही नविन योजना तयार करण्यात आल्या. त्यात विविध तत्व दृष्टीकोनातून भारतातील आदिवासी विकास करण्यासाठी काही आदिवासी काही आदिवासी क्षेत्राची निवड करण्यात आल्यामुळे बाकी क्षेत्र विकासाच्या प्रक्रियेत बाहेर राहीले.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत Varriear elevin कमिटीची स्थापना करुन आदिवासी विकासासाठी Block System चा अवलंब करुन आदिवासी विकास करण्याचा प्रयत्न केला. चवथ्या पंचवार्षिक योजनेत 489 Block ची विभागणी करुन आदिवासी विकास करण्याचा याही योजनेत प्रयत्न केला. परंतु वरिल चारही योजनेत पुरेशा नियोजना अभावी व पुरेशा अभ्यासा विषयी कमतरता असल्यामुळे या योजना कालावधीत आदिवासी समुदयात विकास घडून आलेला नाही. त्यानंतर पाचव्या पंचवार्षिक योजनेत आदिवासी उपयोजनांची सुरूवात करून या योजनेत TSP अंतर्गत विविध योजना राबवून फक्त त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे एवढाच उद्देश नव्हता. तर आदिवासी समुहात शाश्वत आधारावर त्यांच्यात क्षमता व कुशलता निर्माण करणे हा होता.

या योजनेत राज्यात व केंद्र शासीत प्रदेशात आदिवासीच्या प्रमाणात निधीची उपलब्धता करून देणे, संपूर्ण नियोजन करण्याच्या दृष्टीकोनातून क्षेत्र विकासाला प्राधान्य देण्यात आले असून आदिवासी क्षेत्रात विविध संसाधन साधनांची शोध घेणे, आदिवासी विकासाच्या दृष्टीकोनातून ठळक रचनेची निर्मिती करणे, प्रषासनाच्या माध्यमातून विविध कार्यक्रमाची अमलबजावणी करणे, या योजनेत 65% आदिवासीचा अंतर्भाव झाला नसल्यामुळे सहाव्या पंचवार्षिक योजनेत माडा, भिमीमाडा व क्षेत्र विकास या माध्यमातून रचना करून आदिवासी उपयोजना 75% आदिवासी समुहाचा अंतर्भाव झाला.

टादिवासी उपयोजनेत भारतातील ज्या राज्याची व केंद्र शासीत प्रदेशाची लोकसंख्या 60% पेक्षा जास्त आहे, अशा राज्यात TSP लागू होत नाही. त्या राज्यांना वेगळी आदिवासी योजना विकासाच्या दृष्टीकोनातून विविध कार्यक्रम राबवून त्याची अमलबजावणी केली जाते. (आंधप्रदेश, मेघालय, मिंझोरम, नागालॉड, लक्षव्दीप व दादर–नगर हवेली)

## चंद्रपूर जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प :


चंद्रपूर जिल्हयात 1975 पासून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत आदिवासी समुदयाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून विविध शिर्षाखाली विविध योजना राबवून त्याची अमलबजावणी केली जाते. अध्ययन क्षेत्रात चंद्रपूर एकात्मिक आदिवासी विकास व चिमूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प असे दोन प्रकल्प आहेत.

**चंद्रपूर (ITDP) –** चंद्रपूर, बल्लारपूर, राजूरा, जिवती, पोंभूर्णा, सावली, मुल, सिंदेवाही, कोरपना, गोंडपिपरी या तालुक्याचा समावेश आहे.

**चिमूर (ITDP) –** चिमूर, वरोरा, भद्रावती, नागभिड, ब्रम्हपूरी या तालुक्याचा समावेश आहे.

## प्रकल्पाचे प्रशासन :

आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने 1992 मध्ये या विभागाची पुणर्रचना करण्यात आली.




**तक्ता क्र. 3.11**

**सामाजिक व सामुहिक सेवा शिर्षा खालील योजनावरिल प्राप्त निधी व खर्च निधी**

**(रुपये लाखात)**

| उपशिर्ष | वर्ष | प्राप्त निधी | खर्च निधी |
|---|---|---|---|
| **शिर्ष : सामाजिक व सामुहिक सेवा** सामान्य शिक्षण, तंत्र शिक्षण, वैद्यकिय शिक्षण, उच्च शिक्षण (नविन), उच्च शिक्षण (कला), व्यावसायीक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, नगरविकास, मागासवर्गीयांचे कल्याण, क्रीडा व युवक कल्याण, पाणीपुरवठा, माहीती व प्रसिद्धी, महीला व बालविकास , कामगार कल्याण, वैद्यकिय शिक्षण, पोषण | 2000—01 | 584.32 | 494.32 |
| | 2001—02 | 760.01 | 665.11 |
| | 2002—03 | 1024.18 | 819.01 |
| | 2003—04 | 1111.54 | 925.17 |
| | 2004—05 | 1265.32 | 1015.32 |
| | 2005—06 | 1812.78 | 1467.78 |
| | 2006—07 | 1788.82 | 1388.82 |
| | 2007—08 | 1930.35 | 1527.5 |
| | 2008—09 | 2855 | 2365.52 |
| | 2009—10 | 3281.72 | 2420.88 |
| | 2010—11 | 3082.94 | 2271.23 |
| | 2011—12 | 4985.80 | 3795.8 |
| | 2012—13 | 5669.20 | 4763 |
| | 2013—14 | 5940.5 | 5621.5 |
| | 2014—15 | 7512 | 6582.3 |
| | 2015—16 | 7311 | 7067 |
| | 2016—17 | 8293.43 | 8087.99 |

**स्त्रोत** : चंद्रपूर व चिमूर क्षेत्र प्रकल्प कार्यालय (सन 2000 ते 2017)

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत आदिवासींचे आर्थिक, सामाजिक सबलीकरण व शैक्षणिक कृतिशिलता निर्माण करण्यासाठी सामाजिक व सामुहिक सेवांद्वारे सामान्य शिक्षण, तांत्रीक शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, कला व संस्कृती, सार्वजनिक आरोग्य, ग्रामीण पाणीपुरवठा, गृहनिर्माण, नगरविकास, कामगार कल्याण, महीला व बालविकास, पोषण इत्यादी उपविकास शिर्षाखाली अनेक योजना राबविण्यात येतात. या माध्यमातून आदिवासी समुदायाला सक्षम विकासाची जोड देऊन विकास प्रक्रियेचा भाग बनविण्याच्या उद्दिष्टाप्रत शासन प्रशासन प्रयत्नशिल असल्याचे दृष्टीक्षेपास दिसते.

अध्यन क्षेत्रातील प्रकल्पामार्फत राबविण्यात येत असलेल्या सामाजिक व सामुहिक सेवा या विकासा शिर्षांतर्गत उपशिर्षावरील वर्ष निहाय खर्च व प्राप्त निधीची परिणामकता जाणून घेतल्यास योजनेचे प्रारूप समाज विकासाचे एक शाश्वत चेहरा म्हणून आकाराला आलेला दिसून येतो. साधारणतः सारणीचे अवलोकन केले असता सामाजिक व आर्थिक सेवा या शिर्षा खाली विविध वर्षातील प्राप्तनिधी व खर्चनिधीची आकडेवारीवर लक्ष केंद्रीत केले असता 2000–2001 ते 20016–17 या वर्षात शासनाकडून बऱ्याच प्रमाणात निधीची उपलब्धता झाली असून या वर्ष दरम्यान सामान्य शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, नगर विकास, कामगार कल्याण इत्यादी योजनावर होणाऱ्या खर्चातही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. परंतु शासनाकडून प्राप्तनिधी व खर्चनिधीत तफावत जास्त आहे. म्हणजेच प्राप्तनिधीतून बराचसा निधी खर्च होत नसल्यामुळे आदिवासी समुदायाच्या विकासात वाढ घडविण्याचे शासनाचे प्रयत्न तोडके दृष्टीस पडतात. शासनाने फक्त विविध माध्यमातून निधीची उपलब्धता करून देण्याबरोबर त्या निधीचा खर्च करून प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनाची परिपुर्ण अंमलबजावणी प्रशासनाच्या माध्यमातून करावी. आदिवासीच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहुन त्याच्या मागासलेपणाची समस्या दूर करून त्याच्या जिवनात एक प्रकाशमय असा बदल घडवून आणावा.

**तक्ता क्र. 3.16**

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत वर्ष निहाय झालेला आदिवासी कल्याण विषयक योजना वरील प्राप्त निधी, खर्च निधी व लाभार्थी संख्या दर्शक तक्ता**

| अ. क्र. | योजनांची नावे | प्राप्त निधी (लाखात) | खर्च निधी (लाखात) | लाभार्थी संख्या | राबविलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1. | घरकुल योजना | 312.80 | 290.86 | 613 | 2003–2010 |
| 2. | ठक्करबाप्पा वस्ती सुधार कार्यक्रम | 360.50 | 113.72 | 375 | 2007–2010 |
| 3. | जनजाती योजना राबविणे | 6.50 | 6.50 | 65 | 2004–08 |
| 4. | प्रौढ शिक्षण प्रशिक्षण | 0.48 | 0.48 | – | 2004–06 |
| 5. | सांस्कृतिक संकुलाचे बांधकाम | 2.47 | – | – | महीती उपलब्ध नाही. |
| 6. | गॅस संच पुरवठा | 380.75 | 375 | 6609 | 2006–12 |
| 7. | विद्युत फिंटीग | 3.18 | 3.10 | 178 | 2002–07 |
| 8. | कन्यादान योजना | 199.50 | 180.50 | 785 | 2003–12 |
| 9. | अंधश्रद्धा निर्मुलन | 0.10 | 0.10 | – | 2004–06 |
| 10. | आदिवासींना जमीन खरेदी सहाय्य | 18.80 | 17.80 | 82 | 2004–07 |
| 11. | भुमीहीन सबलीकरण व स्वाभीमान योजना | योजना राबविली नाही | | | |
| 12. | आदिवासी कुटुंबांना गवती छपरे बदलविण्यास शिट्स वाटप | 38 | 18 | 320 | 2003–07 |
| 13. | जनजागृती मेळावा | 6.90 | 6.30 | 52 | 2005–10 |
| 14. | क्षेत्रीय यंत्रणा बळकट करणे | 10.00 | खर्चा विषयी आकडेवारी उपलब्ध नाही. | | |
| 15. | गृहनिर्माण वित्तीय सहाय्य | 5.00 | खर्चा विषयी आकडेवारी उपलब्ध नाही. | | |
| | **एकूण** | **1589.51** | **1012.36** | **9079** | |

**स्त्रोत** : चंद्रपूर व चिमूर क्षेत्र प्रकल्प कार्यालय

देशातील कोणत्याही समाजाचे कल्याण होण्यासाठी सर्वांगीण विकास होणे आवष्यक आहे. त्याचाच एक भाग देशातील आदिवासी समुह हा सामाजिक कल्याणविषयी प्रवाहातून बाहेर असल्यामुळे त्या समुहाला विकासाच्या प्रक्रियेत आणणे हे कल्याणकारी राज्यात सरकारची जबाबदारी आहे. सरकारने आदिवासी समुहाला विकास प्रक्रियेत आणुन त्या समाजातील लोकाचे कल्याण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याच्या उद्देशाने आदिवासी विकास प्रकल्पामार्फत आदिवासी कल्याण विषयक योजना कार्यक्रमाअंतर्गत विविध योजना राबवून त्यांच्या जिवनमानात बदल घडविण्याचे कार्य सुरू केल्याचे दिसून येते.

प्रकल्पाअंतर्गत प्राप्त झालेल्या आदिवासी कल्याणविषयक योजना संबंधीच्या आकडेवारी वरून असे लक्षात येते की, सन 2000 ते 2012 या कालावधीत एकही योजना या 12 वर्षाच्या कालावधीत परिपुर्ण राबविण्यात आलेली प्रत्ययास येत नाही. शासनाकडून प्राप्त निधी रू. 1589.51 लक्ष प्राप्त झाला असून योजनांवरील खर्च निधी रू. 1012.36 लक्ष दिसून येतो. तर 9079 एवढे लाभार्थी लाभ घेतल्याचे स्पष्ट होतात. प्राप्त निधी व खर्च निधी यात तफावत आहे. त्यात प्राप्त निधीची रक्कम पुर्णतः खर्च केली नसल्यामुळे काही लाभार्थी लाभापासून वंचित राहिल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे सांस्कृतिक संकुलाचे बांधकाम, गृहनिर्माण वित्तीय सहाय्य योजना, भुमीहीन सबलीकरण व स्वाभिमान योजना, क्षेत्रीय यंत्रणा बळकटी करण्यास अनुदान उपलब्धतेबाबत शासनास प्रकल्पामार्फत पाठपुरावा करण्यात आला. परंतु शासनाने कोणतीही दखल न घेता योजनासंबंधी अनुदान निधी उपलब्ध करून दिला नाही. त्यामुळे आदिवासींना स्वावलंबी बनविण्याबाबत एकंदरीत त्याचे सक्षमीकरण करण्याबाबत शासन व प्रशासन दोन्ही घटक अपयशी ठरलेले दिसून येतात. परंतू प्रकल्प कार्यालयामार्फत काही योजना यशस्वीरित्या राबविल्या जात आहेत, मात्र योजनाबाबत सातत्य नसणे हे विशेष स्वरूपात अध्ययनातून स्पष्ट होते.

## निष्कर्ष :

1) प्रकल्पा अंतर्गत सामाजिक व सामुहीक शिर्षा खालील विविध योजना राबविल्या जातात.
2) प्रकल्पा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेत सातत्य नाही.
3) प्रकल्पा अंतर्गत काही योजना काही वर्षात राबविल्या गेल्या.
4) प्रकल्पा मार्फत विविध योजनांवर प्राप्त निधी पुर्णतः खर्च केल्या जात नाही.
5) शासनाकडून प्रकल्पाला निधी कमी प्राप्त होतो.

## संदर्भ :

1) लोटे रा.ज.आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲंड कं. पब्लिशर्स, नागपूर .2004.
2) वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल 2013–14, 2014–15, 2015–16, 2016–17 : महाराष्ट् शासन, आदिवासी विभाग.
3) माहीती पुस्तीका सन 2015–16 : महाराष्ट् शासन, आदिवासी विभाग.
4) गारे गोविंद आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, 1994.
5) नागतोडे गौंडे गुरूनाथ, संशोधन पध्दती, फडके प्रकाशन कोल्हापूर, 2011.
6) अर्थसंवाद त्रैमासीक.
7) W.W.W.MAharashtragovt.in itdp
8) योजना मासीक.
9) संपादीत, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, चंद्रपूर जिल्हा, 2011–12 अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट् शासन, मुंबई, 2012.